# जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर

P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD, PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in


पुणे पोलीस

**प्रेसनोट क्र.२४९ दि.०५/०२/२०२०**

## हडपसर पोलीस स्टेशन,पुणे शहर

**गाडीला कट मारलेच्या किरकोळ कारणावरुन गंभीर जखमी करणा-या आरोपीतांना**

**हडपसर पोलीसांकडुन ४८ तासाच्या घेतले ताब्यात**

हडपसर पोलीस स्टेशन हददीत दिनांक ०२/०२/२०२० रोजी पहाटे ०१.३० ते २.०० वाजेच्या सुमारास मुंढवा चौकात गाडीला कट मारला या कारणावरुन इसम नामे अक्षय ज्ञानेश्वर जाधव वय २४ वर्षे रा. कासरीवाल पुष्प नागेश्वर वाडी, औरंगाबाद व सतिश सुधाकर वानखेडे यांचा आरोपीतांनी त्यांचे चार चाकी वाहनाने पाठलाग करुन त्यास हॉटेल कल्ट याचेजवळ अडवुन गाडीतील चार अनोळखी इसमांनी सतिश वानखेडे यांना धारदार शस्त्राने खांदयावर, पाठीवर व डोळ्यावर वार करुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केलेला होता. म्हणुन हडपसर पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.

सदर गुन्हयाचा तपास हडपसर पोलीस स्टेशनचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री.रमेश साठे यांचे सुचनेप्रमाणे व मार्गदर्शनाखाली तपासपथकाचे सपोनि प्रसाद लोणारे व त्यांचे स्टाफने काहीही पुरावा अथवा माहीती नसतांना यातील जखमी इसम सतिश सुधाकर वानखेडे याचेकडे आरोपीतांचे वर्णन व घटनाक्रम व गाडीवर असलेला महाराष्ट्राचे नकाशाचा लोगो असल्याची माहीती करुन घेवुन पुढील तपास सुरु केला. सदर घटनेचा तपास करीत असतांना हडपसर, मुंढवा हदीमध्ये पोशि/ कुसाळकर पोशि/ चित्ते व पोशि/ विजय पवार यांनी सुमारे ३२ कॅमेरे चेक करुन सदर आरोपीतांनी वारलेली कार एक संशयीत वाहन शोधण्यात या पथकाला यश आले. सपोनि प्रसाद लोणारे यांनी घटनेचे गांभीर्य ओळखुन जलदगतीने तपास करुन तात्काळ गाडीची आरटीओ व इतर ठिकाणाहुन माहीती प्राप्त करुन आरोपीतांना मुंबई व पुणे या ठिकाणी जावुन सखोल तपास करुन सदर गुन्हयातील एकुण तिन आरोपी नामे १) योगेश चंद्रकांत हनमणे् वय- २४ रा. सोलापुर २) रितेश अंबादास जाधव वय-२१ रा.केशवनगर मुंढवा ३) अविनाश सुनिल गायकवाड वय- २२ रा.केशवनगर मुंढवा असे व गुन्हयात वापरलेली कार असे ४८ तासाच्या आत ताब्यात घेतले आहे. यामधील एक आरोपी फरार आहे. गुन्हयातील जखमी सतीष वानखेडे हे एक उच्च शिक्षत असुन त्यांनी मेडीकल मधील ऑप्थॉमीस्ट (डोळयांबाबत) या विषयाचे शिक्षण घेतले आहे. आरोपांनी त्याचे कारचे पुढे मोटर सायकल आल्याचे किरकोळ कारणावरुन सतीष वानखेडे यांना एका डोळ्यावर व अंगावर धारधार शस्त्राने वार केले आहेत. दाखल गुन्हयाचा पुढील तपास मपोउनि क्षीरसागर या करीत आहेत. आरोपीतांचे गाडीवर असलेल्या महाराष्ट्राचे नकाशाचा लोगोवरुन सदरचा गुन्हा उघडकीस आणलेला आहे

सदरची कामगीरी ही मा.श्री.सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त सो. पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा.श्री.सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त सो. परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली मा.श्री.सुनिल कलगुटकर, सहाय्यक पोलीस आयुक्त सो.हडपसर विभाग पुणे,यांचे सुचनेनुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.रमेश साठे यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक प्रसाद लोणारे, पोहवा/ रमेश साबळे, पोशि/अनिल कुसाळकर, पोशि/ अमित कांबळे, पोशि/ विजय पवार, पोशि/ ज्ञानेश्वर चित्ते, पोशि/ प्रशांत नरसाळे यांनी केली आहे.


रोटरी क्लब
हडपसर पुणे